पुढारी

# लोकलेखा समितीची येरवडा मध्यवर्ती कारागृहास भेट

**पुणे** : महाराष्ट्र विधानमंडळ लोकलेखा समिती प्रमुख आमदार विजय वडेट्टीवार यांच्यासह समिती सदस्यांनी येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या विविध विभागास भेटी देऊन कामकाजाची माहिती घेतली. यावेळी बंदीसोबत संवाद साधून कारागृहाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत माहिती घेतली. याप्रसंगी समिती सदस्य आमदार ड. अनिल परब, कृपाल तुमाने, संजय खोडके, सत्यजीत तांबे, समीर कुणावार, अनिल पाटील, सुहास बाबर, रोहित पवार, विधान मंडळाचे सहसचिव नागनाथ थिटे, उपसचिव उमेश शिंदे उपस्थित होते.

मोहनदास करमचंद गांधी यार्ड, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यार्ड, किशोर यार्ड, दूरदृष्य प्रणाली कक्ष (व्हीसी रुम), मुलाखत कक्ष, ई-मुलाखत कक्ष, कारखाना विभाग, नवीन बॅरेक, अतिसुरक्षा विभाग, स्वयंपाकगृह आदी विभागांना भेटी देऊन समितीने तेथील कामकाजाची माहिती घेतली. यावेळी अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई, कारागृह अधीक्षक सुनील ढमाळ उपस्थित होते.

My Pune Edition
Sep 12, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com